# वसंतराव नाईक शेतीमित्र २००८

## श्री. आसाराम मारोतराव लोमटे

### गौरव, संभाजी नगर, परभणी



- गेल्या १२ वर्षापासून दै. लोकसत्ता या वृत्तपत्राचे परभणी जिल्हा प्रतिनिधी
- पुण्याच्या देशमुख आणि कंपनीच्या वतीने 'इडा पिडा टळो' हा कथासंग्रह २००६ साली प्रसिध्द. या कथा संग्रहातील आजच्या शेतकरी जीवनाच्या नेमक्या चित्रणाचे रेखाटन.
- वेगवेगळया साहित्य संमेलनांच्या व्यासपीठावरुन विचार मांडून शेतकरी आणि साहित्य असा अनुबंध जोडला.
- 'बी.टी. कापूस आहे तरी', 'बियाणे बाजार कसा चालतो', 'साखर उद्योगाचे भवितव्य काय?' या प्रसिध्द केलेल्या विशेषांकांनी राज्यातील शेतक-यांमध्ये जाणीव जागृती घडविण्याचे काम.
- राज्यात शेतक-यांच्या आत्महत्या सुरु असताना वेगवेगळया लेखकांच्या मुलाखती घेऊन शेतक-यांनी आत्महत्येपासून परावृत्त व्हावे आणि जिद्दीने संकटावर मात करावी अशा स्वरुपाच्या विचारांची विविध मुलाखतीतून मांडणी.
- कोरडवाहू शेतक-यांच्या यशकथांना प्रसिध्दी देऊन शेतक-यांमध्ये आत्मविश्वास व त्यांचे मनोबल वाढविण्यासाठी लेखन. या यशकथांच्या माध्यमातून अन्य शेतक-यांमध्ये प्रेरणा निर्माण व्हावी आणि शेतक--यांनी जबरदस्त अशा चिकाटीने संकटांचा सामना करावा, अवर्षणातही आपली उमेद अणि जिद्द कायम ठेवावी असा आशय प्रतिबिंबीत.

# वसंतराव नाईक शेतीमित्र २००८

## श्री. अशोकराव किसन थोरात

### मु.पो. मलकापूर, ता. कराड, जि. सातारा



- एकूण जमीन धारणा ४.०४ हे. असून सिताफळ, नारळ, आंबा, चिकू इत्यादी फळपिके. सन १९८४ मध्ये दक्षिण पूर्व आशियाई देशांचा शेती विषयक अभ्यास दौरा तसेच सन १९८६ मध्ये इंग्लड, फ्रान्स, जर्मनी, इटली, स्वीस, हॉलंड, डेन्मार्क या सात देशांचा शेती, सहकार व दुग्ध व्यवसाय संदर्भात अभ्यासदौरा करून त्याबाबतचे लिखाण.
- यशवंत कृषि विकास संस्थेची स्थापना करून सन २००३ ते २००८ या कालावधीत महाराष्ट्रामध्ये शेतक-यांनी शेतक-यांसाठी घेतलेले ना नफा ना तोटा या तत्त्वावरील यशवंत कृषि औद्योगिक व पशुपक्षी प्रदर्शनाचे कार्याध्यक्ष म्हणून यशस्वी आयोजन.
- ऊस बागायतदार संघ, केळी बागायतदार संघ, सेंद्रीय शेतीमाल संस्था, मका प्रक्रिया संस्था स्थापनेत पुढाकार. तसेच लक्ष्मीदेवी कृषि विज्ञान मंडळाची स्थापना.
- यशदा, पुणे येथे लोक प्रतिनिधींसाठी आयोजित केलेल्या प्रशिक्षण व चर्चासत्रामध्ये विविध विषयावरील १५० व्याख्यानाद्वारे मार्गदर्शन.
- गुळ, बियाणे, सेंद्रीय शेतीमाल याबाबतचे महोत्सव व पुष्प प्रदर्शनाचे आयोजन. कृषि प्रदर्शनाच्या निमित्ताने दरवर्षी महाविद्यालयीन विद्यार्थांसाठी शेती विषयक निबंध/पोस्टर स्पर्धा, फोटो प्रदर्शन, रांगोळी स्पर्धांचे आयोजन.

# वसंतराव नाईक शेतीमित्र २००८

## श्री जगदीश जयंत बन्सोड

रवि अपार्टमेंटस्, प्लॉट क्र. ८१, लक्ष्मी नगर झोन गेटसमोर, लक्ष्मी नगर, नागपूर - १०



- सन २००० ते २००७ या कालावधीत ई.टि.व्ही. या मराठी वाहिनीच्या अन्नदाता कार्यक्रमाचे मुख्य छायाचित्रकार म्हणून कार्यरत. सन २००६ पासून शेतकरी दिनदर्शिका (नागपूर) अन्नदाता (हैद्राबाद), शरद कृषि (पुणे) व विदर्भातून प्रकाशित होणा-या दैनिक वृत्तपत्रामध्ये कृषि तंत्रज्ञान विषयक आणि कृषि तंत्रज्ञानावर आधारित यशोगाथा लिहून या माध्यमाव्दारे शेतक-यांपर्यत शेतीविषयक माहिती पोहचविण्याचे काम प्रभावीपणे केले.
- शेतक-यांच्या व कृषि विभागाच्या संपर्कात राहून कृषिविषयक तसेच शेतीपूरक व्यवसाय पशुसंवर्धन, इमूपालन, दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन इत्यादी क्षेत्रात झालेल्या उल्लेखनीय कामांचे यशोगाथांच्या स्वरूपात जनमानसात व शेतक-यांपर्यत ज्ञान पोहचविले.
- ई. टि.व्ही. अन्नदाता या वाहिनीसाठी जवळपास ११०० लघुपट तयार करुन पाठविले तसेच कृषि विभागासोबत विदर्भातील विविध विषयांवर लघुपट तयार केले. हे लघुपट शेतक-यांना शेतीशाळेत, कृषि मेळाव्यात व इतर ठिकाणी दाखवून कृषि विस्ताराचे कार्य केले.
- प्रगतीशील शेतक-यांच्या शेतावर परिसरातील इतर शेतक-यांच्या क्षेत्रीय भेटी घडवून आणल्या.
- कृषि व संलग्न क्षेत्रात केलेल्या कार्याबद्दल सन २००७ मध्ये रेशीम संचालनालय यांचेतर्फे रेशीम पुरस्कार तर सन २००८ मध्ये अरविंद बाबू देशमुख प्रतिष्ठान, नागपूर तर्फे कृषि पत्रकारिता पुरस्कार प्रदान करून सन्मानित.

# वसंतराव नाईक शेतीमित्र २००८

## सात बाराच्या बातम्या, स्टार माझा,

### ऑफ डॉ. इ. मोजेस रोड, महालक्ष्मी, मुंबई - ४४००२१




- शेतीविषयक विविध पिकांचे आधुनिक तंत्रज्ञान, राज्यातील प्रगतीशील शेतक-यांच्या यशोगाथा, कृषिक्षेत्रातील घडामोडी इ. बाबतची इत्यंभूत माहिती मराठीत शेतक-यांपर्यंत पोहचविण्याच्या उद्देशाने सात बाराच्या बातम्या हा कार्यक्रम सुरू केला. हा कार्यक्रम दररोज सकाळी ७.४०, १०.४० व दुपारी १२.२० वाजता प्रसारीत करण्यात येतो.
- या कार्यक्रमाद्वारे राष्ट्रीय - आंतरराष्ट्रीय शेती जगताची खबरबात, हंगामनिहाय शेती उपयोगी वेगवेगळया टिप्स्, शासनाचे कृषि विषयक धोरण व उपक्रम विषयांचा समावेश करून शेतीमध्ये वेगवेगळया हंगामात करावयाच्या कामांची माहिती तज्ञांकडून शेतक-यांना दिली जाते.
- या कार्यक्रमाद्वारे शेतक-यांच्या हक्कांची जाणीव त्यांना करून दिली जात आहे. ऊस साखर कारखाने, ऊस-गूळ उत्पादक शेतकरी, ऊसतोड कामगारांचे प्रश्न, दुग्धव्यवसायातील यशोगाथा, दुध भेसळीच्या प्रश्नावर जागृती इत्यादी बाबत कार्यक्रम प्रसारित करून राज्यातील शेतक-यांसाठी बहुमोल विस्तार कार्य केले.
- साखर, तांदुळ, गहू, कांदा आयात-निर्यातीबाबतची धोरणे, त्याचा परिणाम यावर सतत लक्ष केंद्रीत करून त्याची माहिती सर्वसामान्यांना करून देण्यासाठी सदर वाहिनी अग्रगणी राहिली आहे.
- सन २००८ च्या दुष्काळसदृश परिस्थितीतही शेतक-यांनी केलेल्या उपाय योजनांवर ‘दुष्काळातील पालवी’ हा विशेष कार्यक्रम व जनसामान्यांमध्ये पर्यावरणाबाबत जागरूकता निर्माण व्हावी यासाठी दर रविवारी ‘माझी बाग’ हा विशेष कार्यक्रम प्रसारित.